मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

दैनिक

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ४७४ वा ● शुक्रवार, ता. १९ डिसेंबर २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

# प्रधानमंत्री आवास योजनेतून गरजूंना घरे देऊ

## पुढील पाच वर्षे विकासकामांतून तुमची काळजी घेईन- मुख्यमंत्री फडणवीस

**पाथर्डी । नितीन गटाणी**

गेल्या अनेक वर्षांपासून शहरी भागातील गोरगरीब नागरिक मिळेल त्या जागेवर घर करून राहत आहेत. अशा रहिवाशांना प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ मिळवून देत त्यांचे जीवनमान उंचावले जाईल. अतिक्रमण असलेल्या जागांवरील रहिवास नियमित करून गरजूंना या योजनेचा लाभ उपलब्ध करून देण्यात येईल, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. येत्या २० तारखेला तुम्ही केवळ कमळाची काळजी घ्या; पुढील पाच वर्षे विकासकामांच्या माध्यमातून मी तुमची काळजी घेईन, असेही त्यांनी सांगितले. पालिका निवडणुकीच्या प्रचाराची सांगता बाजारतळावर आयोजित सभेत झाली. या सभेत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पालकमंत्री



राधाकृष्ण विखे होते. यावेळी आमदार मोनिका राजळे, आमदार सुरेश धस, अक्षय कर्डिले, सुवेंद्र गांधी, पक्ष निरीक्षक विवेक नाईक, नगराध्यक्षपदाचे उमेदवार अभय आव्हाड, विष्णुपंत अकोलकर, सुभाष बर्डे, संदीप पठाडे, भाजप शहराध्यक्ष ज्योती शर्मा, तालुकाध्यक्ष धनंजय बडे यांच्यासह स्थानिक पदाधिकारी व सर्व उमेदवार व्यासपीठावर उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले की, आमदार मोनिका राजळे यांनी मोठ्या प्रमाणात निधी मिळवून शेकडो कोटी रुपयांच्या पाणीपुरवठा व भुयारी गटार योजनांना मंजुरी मिळवून दिली. प्रत्येक घरात नियमित नळाद्वारे पाणीपुरवठा होईल, असे नियोजन करण्यात आले. घनकचरा व्यवस्थापनासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरून कचऱ्यापासून पर्यावरणपूरक इंधन, वीज व वाहनांसाठी गॅस निर्मिती केली जाणार आहे. यामुळे रोगमुक्त व प्रदूषणमुक्त शहरी परिसर निर्माण करण्याचा प्रयत्न राहील. राज्यात सहा कोटी 'लाडक्या बहिणी' असून, त्यातील एक आमदार म्हणून मोनिका राजळे विधानसभेत कार्यरत आहेत. परिवर्तनासाठी भाजपला मतदान करा, असे आवाहन करताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी विरोधकांवर टीका टाळली. दरम्यान, आमदार मोनिका राजळे यांनी भाषणात विरोधकांवर तीव्र शब्दांत टीका केली. स्वार्थासाठी पालिकेचे भूखंड नावावर करून घेणे व लिंगायत समाजाच्या जमिनीवर आरक्षण टाकण्याचा आरोप करत त्यांनी राष्ट्रवादीचे नेते प्रताप ढाकणे व नगराध्यक्षपदाचे उमेदवार बंडू बोरुडे यांचे नाव न घेता चौकशीची मागणी केली. त्यांच्या या आक्रमक भाषणामुळे प्रचार सभेत राजकीय वातावरण तापले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी आमदार राजळे यांच्या बहुसंख्य मागण्यांची दखल घेत तालुक्यातील विकासकामांचे श्रेय त्यांना दिले. पालिकेच्या विकासकामांचा आढावा घेताना, 'राहत्या घरापेक्षा पालिकेची इमारत अधिक भव्य व सुसज्ज आहे,' असा गौरवपूर्ण उल्लेख करताच पालकमंत्री विखे यांनी हसून दाद दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आमदार मोनिका राजळे यांनी केले. सूत्रसंचालन राजेंद्र सुरवसे यांनी तर आभार अक्षय कर्डिले यांनी मानले.




# विज्ञानातून समाजबदल शक्य- मुख्यमंत्री सावंत

## मनोहर पर्रीकर विज्ञान महोत्सवाचे उद्घाटन

**पणजी । रयत समाचार**

राज्य सरकारतर्फे आयोजित करण्यात आलेला मनोहर पर्रीकर विज्ञान महोत्सव विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार असून विज्ञान हा विषय केवळ पाठ्यपुस्तक किंवा प्रयोगशाळेपुरता मर्यादित नाही, हे या महोत्सवातून विद्यार्थ्यांना समजेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी केले. गुरुवारी पणजी येथे मनोहर पर्रीकर विज्ञान महोत्सवाच्या सातव्या आवृत्तीच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. मुख्यमंत्री सावंत म्हणाले की, या महोत्सवामुळे राज्यात वैज्ञानिक दृष्टिकोन वाढण्यास निश्चितच मदत होईल. महोत्सवाअंतर्गत १८ ठिकाणी १९ शास्त्रज्ञ दोन हजारांहून अधिक विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधणार आहेत. या संवादातून विद्यार्थ्यांना विज्ञानातील नव्या संकल्पना, संशोधन, प्रयोगांदरम्यान येणाऱ्या अडचणी व त्यावर शोधलेले उपाय यांची माहिती मिळेल. तसेच या क्षेत्रात उपलब्ध असलेल्या विविध संधीही विद्यार्थ्यांना समजतील. विज्ञानाच्या माध्यमातून समाजातील विविध समस्यांवर उपाय शोधता येऊ शकतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी कोणताही संकोच न बाळगता या क्षेत्रात कार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. शिक्षकांनीही विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयीची उत्सुकता कायम राहील, यासाठी प्रयत्न करावेत, असे ते म्हणाले. गोवा हे लहान राज्य असले तरी येथे राष्ट्रीय पातळीवरील शिक्षण व संशोधन संस्था कार्यरत असून, स्थानिक विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घ्यावा, असेही त्यांनी नमूद केले. यावेळी डॉ. अनिल काकोडकर व डॉ. सुनील सिंग उपस्थित होते. तसेच साई गौतम गोपाळ कृष्णन यांना 'मनोहर पर्रीकर युवा शास्त्रज्ञ' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. दरम्यान, डॉ. अनिल काकोडकर यांनी सांगितले की, हा विज्ञान महोत्सव गोव्याच्या भविष्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. युवकांनी देशातील समस्या ओळखून त्यावर विज्ञानाच्या माध्यमातून उत्तरे शोधावीत आणि विज्ञानाला आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनवावा, असे आवाहन त्यांनी केले.

# अनेक योजना अधांतरी, शहर विकासासाठी विशेष पॅकेज जाहीर करा- आ.पाटील

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

शहराला मिळणारा विकास निधी इतर जिल्ह्यांच्या तुलनेत दहा टक्क्यांपेक्षाही कमी असून, त्यामुळे अनेक महत्त्वाच्या योजना अधांतरी राहिल्या आहेत. या पार्श्वभूमीवर बेळगाव शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सरकारने विशेष पॅकेज जाहीर करावे, अशी मागणी आमदार अभय पाटील यांनी विधानसभेत बोलताना केली. आमदार पाटील म्हणाले की, इंडाल प्रकल्पानंतर बेळगावात कोणताही मोठा उद्योग स्थापन झाला नाही.

शहरातील सांडपाणी व्यवस्थापनासाठी सुमारे ८५० कोटी रुपयांची आवश्यकता आहे. मात्र या संदर्भातील कामे अद्याप मार्गी लागलेली नाहीत. तसेच आयटी पार्कचा प्रस्तावित प्रकल्पही प्रलंबित असून, तुर्कमट्टी येथील लष्कराच्या ताब्यातील ७४५ एकर जमीन ताब्यात



घेऊन तेथे भव्य आयटी पार्क उभारण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या ऐतिहासिक भेटीच्या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य सरकारच्या सहकार्याने ३०० एकर जागेवर स्वातंत्र्यसंग्रामावर आधारित थिम पार्क उभारण्याचा आराखडा तयार करण्यात आला. महात्मा गांधींनी भेट दिलेल्या स्थळांचा विकास करण्याची योजनाही तयार करण्यात आली होती. मात्र या सर्व प्रकल्पांना अद्याप गती मिळालेली नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. बेळगावात महिलांसाठी स्वतंत्र वस्त्रोद्योग पार्क उभारण्यात यावा, अशी मागणी करत त्यांनी बासमती तांदूळ, शहापुरी साडी, बेळगावचा कुंदा, हुक्केरीतील वांगी, खानापूरचा काजू व संकेश्वरची मिरची यांसारख्या स्थानिक व कृषी उत्पादनांना प्रोत्साहन देण्याचे आवाहन केले.

तसेच फाउंड्री क्लस्टर, संरक्षण उत्पादन, रेल्वे व एअरोस्पेस क्षेत्रातील उद्योगांना चालना देण्यासाठी विशेष धोरण राबवावे, अशी मागणी त्यांनी केली. यासोबतच कर्नाटक मराठा विकास प्राधिकरणासाठी तातडीने निधी मंजूर करावा तसेच साळी समाजासाठी स्वतंत्र विकास मंडळ स्थापन करावे, अशी मागणीही आमदार अभय पाटील यांनी विधानसभेत केली.

# ५ व्या संस्कृती साहित्य संमेलनाध्यक्षपदी ज्येष्ठ कवी सायमन मार्टिन

**इचलकरंजी । रयत समाचार**

येथील संस्कृती प्रतिष्ठानतर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या पाचव्या संस्कृती साहित्य संमेलनाध्यक्षपदी वसईतील मराठीतील ज्येष्ठ कवी व परिवर्तनवादी सामाजिक चळवळीतील अग्रणी व्यक्तिमत्त्व सायमन मार्टिन यांची निवड करण्यात आली. हे साहित्य संमेलन रविवारी ता. २१ डिसेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता इचलकरंजी येथील सरस्वती हायस्कूल, सुभद्रादेवी माने सभागृहात आयोजित करण्यात आले असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष कवी महावीर कांबळे यांनी दिली. इचलकरंजी हे कष्टकरी जनतेचे शहर म्हणून ओळखले जाते. या शहरात सातत्याने सांस्कृतिक व साहित्यिक उपक्रम होत असतात. साहित्याच्या मुख्य प्रवाहात परिवर्तनवादी विचारांना अधिक व्यापकपणे जोडून घेण्याच्या उद्देशाने पाच वर्षांपूर्वी



संस्कृती साहित्य प्रतिष्ठानची स्थापना करण्यात आली. त्यानंतर दरवर्षी मराठीतील एका महत्त्वाच्या लेखक किंवा कवीच्या अध्यक्षतेखाली एकदिवसीय साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात येत आहे. यापूर्वी कवी अजय कांडर, समीक्षक प्राचार्य गोविंद काजरेकर, कादंबरीकार लक्ष्मीकांत देशमुख आणि कृष्णात खोत यांच्या अध्यक्षतेखाली ही संमेलने यशस्वीरीत्या पार पडली आहेत. यावर्षीच्या पाचव्या साहित्य संमेलनाध्यक्षपदी निवड झालेले कवी सायमन मार्टिन हे गेली चार दशके साहित्य व परिवर्तनवादी चळवळीत सक्रिय आहेत. त्यांची कविता पुरोगामी विचार, सामाजिक संघर्ष, तत्त्वज्ञान, मानवी मूल्ये आणि लोकशाहीची जपणूक या सूत्रांभोवती आकारलेली आहे. समाजाच्या वेदना, अन्याय आणि विषमता यांचे संवेदनशील भान देणारी त्यांची कविता वाचकांच्या मनाला भिडणारी आहे.

# कोष्टी समाजाला उपनगराध्यक्षपदाची संधी...?

## पाथर्डी नगरपरिषदेच्या प्रचाराचा आज शेवटचा दिवस



**पाथर्डी । रयत समाचार**

पाथर्डी नगर परिषदेच्या जाहीर प्रचाराचा आज (गुरुवार) शेवटचा दिवस आहे. या निवडणुकीत भाजपा, महाविकास आघाडी व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात सामना होत आहे. अजित पवार गटाचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार, संजय भागवत यांनी माघार घेतल्याने भाजपासाठी काही काळ एकतर्फी भासू लागलेल्या या निवडणुकीत पुन्हा एकदा भाजपा व महाविकास आघाडीसाठी समान संधी उपलब्ध झाली आहे. संजय भागवत यांनी माघार घेतल्यानंतर महाविकास आघाडीचे नेते अॅड. प्रताप ढाकणे यांनी मुत्सद्देगिरीचं प्रदर्शन करत, जर महाविकास आघाडी सत्तेत आली तर कोष्टी समाजाला उपनगराध्यक्षपदी संधी देण्याचं सुतौवाच केल्याने कोष्टी समाजाच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. अशातच महाविकास आघाडीने या समाजाला तीन प्रभागांतून उमेदवारी दिल्याने, आजमितीला या निवडणुकीचा अंदाज वर्तविणे कठीण होऊन बसलं आहे.

महाविकास आघाडीच्या वतीने प्रभाग क्रमांक नऊमध्ये कोष्टी समाजाच्या सौ. वंदना टेके या उमेदवार आहेत. गेल्या निवडणुकीत त्यांचे पती सोमनाथ टेके यांनी लक्षणीय मते मिळविली होती. त्या काळात मतदारांवर मोदी लाटेचं गारुड असल्याने त्यांना पराभवाचा सामना करावा लागला असला तरी यावेळी मात्र तशी परिस्थिती नाही. या प्रभागात मराठा, कोष्टी व मुस्लीम समाजाची मते लक्षणीय असल्याने वंदना टेके यांचं पारडं जड असल्याचं मानलं जात आहे. त्यांचे पती व मुलांच्या जनसंपर्कात सातत्य असल्याने, मतदारांचा कल त्यांच्या बाजूने असल्याचं बोललं जात आहे. अशातच पुरोगामी चेहरा म्हणून त्यांची ख्याती आहे. ही जमेची बाजू असल्याने त्यात तथ्यही जाणवत आहे. नगराध्यक्षपदाच्या उमेदवाराला माघार घेण्यास भाग पाडलं गेल्याची भावना, कोष्टी समाजात बळावली आहे. तिचा फायदा वंदना टेके यांना होणार असल्याची चर्चा मतदारांत होत आहे. स्वर्गीय माधवराव निऱ्हाळी व प्रभाकर भागवत हयात असते तर त्यांनी प्रचाराची धुरा स्वत:च्या खांद्यावर घेतली असती व समाजाला उपनगराध्यक्षपदी का होईना संधी उपलब्ध करुन देण्यासाठी जीवाचं रान केलं असतं, असं बोललं जात असल्याचीही चर्चा आहे.

प्रभाग क्रमांक नऊमध्ये मराठा, कोष्टी व मुस्लीम समाजातील मतदारांची संख्या मोठी असल्याने त्यांचा कौल निर्णायक ठरणार आहे, हे मात्र नक्की. यापाठोपाठ जैन समाजाचीही मते आहेत. हा समाज बोलून न दाखवता सामाजिक सलोखा जपण्यास प्राधान्य देत आला आहे. कमी संख्या असली या निवडणुकीत जैन समाजाची मतेही निर्णायक ठरणार आहेत. प्रभाग क्रमांक नऊपुरतं बोलायचं झालं तर या प्रभागात मोठी चुरस निर्माण झाली आहे. काट्याची टक्कर असली तरी जनसंपर्कातील सातत्य, मतदारांसाठी अहोरात्र तत्परता व उपलब्धता या वंदना टेके यांच्या जमेच्या बाजू आहेत. पाथर्डी शहरात मराठा समाजानंतर कोष्टी समाजाचा मोठा मतदार असल्यामुळे महाविकास आघाडीने या समाजाला उमेदवारी देताना झुकतं माप दिलं आहे. त्यामुळे हा समाज काय निर्णय घेतो, यावर या निवडणुकीचं भवितव्य अवलंबून आहे. स्वकष्टार्जित साधनांवर उपजीविका करणारा हा समाज स्वाभिमानी आहे. त्यामुळे नगराध्यक्षपदाची हुकलेली संधी गमावली गेल्याने उपनगराध्यक्षपदासाठी हा समाज एकवटतो की नाही हे सिद्ध होण्यासाठी २१ डिसेंबरची वाट पहावी लागेल.

# २२ डिसेंबरला मनरेगा वाचवण्यासाठी देशव्यापी आंदोलन- कॉ. अॅड. लांडे

## नवीन ग्रामीण रोजगार विधेयकाला भाकपचा विरोध

**मुंबई । रयत समाचार**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (मनरेगा) रद्द करून त्याऐवजी नवीन ग्रामीण रोजगार विधेयक आणण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाविरोधात भारतीय कम्युनिस्ट पक्षाने (सीपीआय) तीव्र आक्षेप नोंदवला असून, २२ डिसेंबर २०२५ रोजी देशभरात आणि राज्यातील सर्व तहसील कार्यालयांवर निदर्शने आयोजित करण्याचे आवाहन केले आहे. ही माहिती भाकपचे राज्य सेक्रेटरी कॉ. अॅड. सुभाष लांडे यांनी दिली.फ मनरेगामधून महात्मा गांधींचे नाव जाणूनबुजून काढून टाकणे हा केवळ प्रशासकीय बदल नसून, तो गांधीजींच्यामूल्यांचा, विचारांचा आणि वारशाचा अपमान असल्याचा आरोप भाकपने केला आहे. हा निर्णय म्हणजे सरकारने फॅसिझमच्या दिशेने टाकलेले पाऊल असून, भारतीय जनता पक्षाच्या धोरणांचा हा भाग असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. भाकपने म्हटले आहे की, हक्कांवर आधारित आणि ''काम करण्याचा अधिकार'' मजबूत करणारा हा ऐतिहासिक कायदा रद्द करून गोरगरीब, श्रमिक आणि मजुरांचे जीवन अधिक कठीण करण्याचे धोरण राबवले जात आहे. मनरेगामध्ये सुचवलेले बदल रोजगार हमीच्या संकल्पनेलाच कमकुवत करणारे असून, यामुळे कामगारांचे शोषण वाढणे अपरिहार्य आहे. डाव्या पक्षांच्या पाठिंब्याने यूपीए सरकारच्या काळात अंमलात आलेला मनरेगा हा भारतीय प्रजासत्ताकाच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा असून, तो राज्यघटनेतील राज्य धोरणाच्या निर्देशक तत्वांवर आधारित आहे. या कायद्यामुळे ग्रामीण भारतात किमान वेतन संस्थात्मक झाले आणि विशेषतः कोविड काळात ग्रामीण मागणी टिकवून ठेवण्यात तसेच अर्थव्यवस्थेला सावरण्यात मनरेगाने मोलाची भूमिका बजावली. प्रस्तावित नवीन विधेयकात दरवर्षी कामाचे दिवस १२५ पर्यंत वाढवण्याचा दावा करण्यात आला असला तरी, मागणी-चालित स्वरूप काढून टाकल्याने कामगारांचा रोजगार मागण्याचा अधिकारच हिरावला जाणार असल्याचे भाकपने म्हटले आहे. यामुळे कंत्राटदार, स्थानिक प्रशासन आणि जमीनदारांचे वर्चस्व वाढण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. तसेच या विधेयकामुळे ४० टक्के आर्थिक भार राज्य सरकारांवर टाकण्यात येणार असून, जीएसटीच्या सदोष रचनेमुळे आणि केंद्राच्या उदासीनतेमुळे आधीच आर्थिक संकटात सापडलेल्या राज्यांसाठी हा मोठा अन्याय असल्याचा आरोप करण्यात आला आहे. वेतनवाढ, हमी कामाचे दिवस आणि व्यापक सल्लामसलत यांशिवाय असा दूरगामी बदल असंवैधानिक व कामगारविरोधी असल्याचे भाकपने स्पष्ट करत, या निर्णयाविरोधात देशभरातील कामगार, शेतकरी आणि लोकशाही शक्ती तीव्र संघर्ष उभारतील, असा इशारा दिला आहे. त्याचाच भाग म्हणून २२ डिसेंबर २०२५ रोजी सर्व जिल्ह्यांमध्ये आणि तहसील कार्यालयांवर निदर्शने आयोजित करण्याचे आवाहन भाकपने सर्व पक्षीय आणि लोकशाही घटकांना केले आहे, असे भाकपचे राज्य सेक्रेटरी कॉ. अॅड. सुभाष लांडे यांनी सांगितले.

महानगरपालिका निवडणुका- २०२६

# ज्येष्ठ नागरिकांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास 'नोटा'चा इशारा




**मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**


महाराष्ट्रातील मुंबईसह सर्व महानगरपालिकांच्या निवडणुका लवकरच होत असून, या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ नागरिकांच्या प्रश्नांकडे सातत्याने होत असलेल्या दुर्लक्षाविरोधात महाराष्ट्रातील ज्येष्ठ नागरिक संघटनांच्या संयुक्त कृती समितीने ठाम भूमिका मांडली. लाखो ज्येष्ठ नागरिकांचे ''सिल्व्हर व्हॉइसेस'' ऐकले गेले पाहिजेत, त्यांचा सन्मान राखला गेला पाहिजे आणि निर्णयप्रक्रियेत त्यांचा अर्थपूर्ण सहभाग सुनिश्चित केला गेला पाहिजे, अशी स्पष्ट मागणी यावेळी करण्यात आली. ज्येष्ठ नागरिक हे केवळ लाभार्थी नसून सुमारे २५ टक्के मतदानसंख्या असलेला एक महत्त्वाचा मतदारवर्ग असल्याने, त्यांच्या मागण्या दुर्लक्षित राहिल्यास आगामी महानगरपालिका निवडणुकांमध्ये 'नोटा' या लोकशाही पर्यायाचा वापर करण्याचा इशाराही संयुक्त कृती समितीने दिला. ''ज्येष्ठांना दया नव्हे, तर सन्मान हवा,'' असे ठाम मत यावेळी व्यक्त करण्यात आले. २०१२ पासून कार्यरत असलेल्या संयुक्त कृती समितीच्या मंचामध्ये २८ ज्येष्ठ नागरिक संघटना, स्वयंसेवी संस्था, संशोधक आणि शैक्षणिक संस्थांचा समावेश आहे. आगामी महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ नागरिकांची सनद (चार्टर ऑफ डिमांड्स) सादर करण्यासाठी ही पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. महाराष्ट्रात सध्या सुमारे १.५ कोटी ज्येष्ठ नागरिक असून ते राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या ११.७ टक्के आहेत. मुंबईत ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांची संख्या सुमारे १५ लाख असून, २०३१ पर्यंत ती जवळपास २४ लाखांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने २०१३ साली जाहीर केलेल्या ज्येष्ठ नागरिक धोरणाचा उद्देश 'वय-मैत्रीपूर्ण मुंबई' निर्माण करणे हा होता. या धोरणांतर्गत डे-केअर सेंटर्स, नानानानी उद्याने, ज्येष्ठांसाठी विशेष रुग्णालय सुविधा, वैद्यकीय हेल्पलाईन तसेच रॅम्प्स व हॅण्डरेल्ससह सुलभ सार्वजनिक पायाभूत सुविधांची तरतूद करण्यात आली होती. मात्र, पुरेशा निधीअभावी आणि स्वतंत्र प्रशासकीय यंत्रणेच्या अभावामुळे या धोरणाची अंमलबजावणी अपुरी आणि संथ राहिल्याची तीव्र खंत यावेळी व्यक्त करण्यात आली. पत्रकार परिषदेत बोलताना मुंबईच्या माजी महापौर अॅड. निर्मला सामंत प्रभावळकर यांनी स्पष्ट केले की, ज्येष्ठ नागरिकांसाठी आयोजित होणारे मनोरंजनात्मक व विरंगुळ्याचे उपक्रम उपयुक्त असले तरी त्यांच्या आरोग्यसेवा, रुग्णालयांतील स्वतंत्र सुविधा, डे-केअर सेंटर्स, नानानानी उद्याने, थेरपी आणि काळजी सेवा या मूलभूत गरजांकडे प्रशासनाचे पुरेसे लक्ष नाही. मुंबईसारख्या महानगरात १५ लाख ज्येष्ठ नागरिक असताना या सुविधा अत्यंत अपुऱ्या असून, त्या तातडीने आणि मोठ्या प्रमाणावर वाढविणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. या पत्रकार परिषदेचे सूत्रसंचालन सोफिया महाविद्यालयाच्या प्रा. अनघा तेंडुलकर यांनी केले, तर शैलेश मिश्रा यांनी आभार प्रदर्शन केले. विचारमंचावर अॅड. निर्मला सामंत प्रभावळकर, प्रकाश बोरगांवकर, विजय औंधे, डॉ. रेखा भटखंडे आणि शैलेश मिश्रा उपस्थित होते.

# गुलमोहोर रोड, वृक्षतोड






अहिल्यानगर महानगरपालिका आपले सहर्ष स्वागत करीत आहे.
अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वृक्षतोडीसाठी मंजूरी देणाऱ्या वृक्ष प्राधिकरण समितीवर गुन्हे दाखल करा. नागरिकांची मागणी !



## 'फनलँड कार्निव्हल' एकल नृत्य स्पर्धेत आराध्या दिवटे हिचे यश



**अहमदनगर । रयत समाचार**

आठरे पाटील पब्लिक स्कूल येथे नुकतीच जिल्हास्तरीय 'फनलँड कार्निव्हल' एकल नृत्य स्पर्धा उत्साहात पार पडली. या स्पर्धेत विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी आपली कला सादर करत प्रेक्षकांची मने जिंकली. या स्पर्धेत कु. आराध्या दिवटे हिने आपल्या उत्कृष्ट नृत्य सादरीकरणाच्या जोरावर ५ ते १० वर्षे वयोगटात तृतीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले.फ स्पर्धेदरम्यान आराध्या हिने सादर केलेल्या नृत्याने उपस्थित प्रेक्षकांसह परीक्षकांचेही लक्ष वेधून घेतले. तिच्या भावपूर्ण आणि तांत्रिकदृष्ट्या अचूक सादरीकरणास भरभरून दाद मिळाली. या यशाबद्दल नृत्य दिग्दर्शिका श्रुतिका ढाकणे यांच्या हस्ते तिचा सन्मान करण्यात आला.

.आराध्या दिवटे ही बाई इचरजबाई प्रशालेत इयत्ता पहिलीत शिक्षण घेत आहे. या यशासाठी तिला महादेव भद्रे, प्रा. डॉ. अनिता भद्रे – दिवटे, नृत्य प्रशिक्षक सौरभ तसेच वर्गशिक्षिका रोहिणी पवार यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या उल्लेखनीय यशाबद्दल अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा छाया फिरोदिया, बाई इचरजबाई प्रशालेच्या मुख्याध्यापिका ज्योती सिसोदिया तसेच प्रसिद्ध नृत्यप्रशिक्षिका सुरेखा डावरे यांनी आराध्या हिचे अभिनंदन केले. तिच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.



## इस्माईल शेख यांचा ज्येष्ठ नागरिक संघाकडून गौरव

**अहमदनगर । आबीद खान**

समाजाच्या हितासाठी सातत्याने कार्य करणाऱ्या व्यक्तीचा सन्मान करणे ही समाजाची नैतिक जबाबदारी आहे. गरजूंना मदतीचा हात, शिक्षण, आरोग्य, सामाजिक ऐक्य आणि माणुसकी जपणाऱ्या उपक्रमांत नेहमीच पुढाकार घेणाऱ्या इस्माईल शेख यांचा वाढदिवस सामाजिक कार्याच्या गौरवरूपाने साजरा करणे ही खरोखरच स्तुत्य बाब असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ नागरिक संघ, मुकुंदनगरचे शरफुद्दीन शेख यांनी केले. मुकुंदनगर येथील ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने इस्माईल शेख यांच्या सामाजिक कार्याचा त्यांच्या वाढदिवसानिमित्त आढावा घेऊन गौरव करण्यात आला.

यावेळी ज्येष्ठ नागरिक संघ मुकुंदनगरचे अध्यक्ष शेख खानसाहब, रऊफ बिल्डर, हाजी आलम खान, माजी प्राचार्य नवेद बिजापुरे, शरफुद्दीन शेख, गोटू जहागीरदार, बिलाल अहमद, अजीज सय्यद, सईद शेख, इस्माईल पापामियां, बशीर पठाण, इस्माईल पठाण, फकीर मोहम्मद शेख तसेच मखदुम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष आबीद दुलेखान आदी उपस्थित होते. यावेळी मनोगत व्यक्त करताना शेख खानसाहब म्हणाले की, सामाजिक जाणीव, सेवाभाव आणि निस्वार्थ कार्याच्या माध्यमातून इस्माईल शेख हे समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील असतात. वाढदिवसानिमित्त झालेल्या सत्काराला उत्तर देताना इस्माईल शेख म्हणाले की, हा सन्मान केवळ एका व्यक्तीचा नसून सामाजिक कार्याच्या मूल्यांचा सन्मान आहे. अधिकाधिक लोकांनी सामाजिक कार्यात सहभागी व्हावे, हीच अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

सत्कारप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी इस्माईल शेख यांच्या कार्याची प्रशंसा करून त्यांच्या पुढील सामाजिक उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या. त्यांच्या आयुष्यात आरोग्य, यश आणि दीर्घायुष्य लाभो, अशी सदिच्छा सर्वांनी व्यक्त केली.

## निवडणूक प्रचारातील प्लास्टिकयुक्त फ्लेक्स, होर्डिंग्जवर बंदीची मागणी

**अहमदनगर । रयत समाचार**

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांकडून मोठ्या प्रमाणावर वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक कोटिंग असलेल्या फ्लेक्स, हँडबिल व होर्डिंग्जवर बंदी घालावी, अशी मागणी पुढे आली. भविष्यात उद्भवू शकणाऱ्या घातक नैसर्गिक संकटांना टाळण्यासाठी हा निर्णय आवश्यक असल्याचे मत जागरूक नागरिक मुकुंद देवगावकर यांनी व्यक्त केले. निवडणूक प्रचारासाठी छापले जाणारे साहित्य आकर्षक दिसावे यासाठी प्लास्टिकयुक्त कागद व रंगबेरंगी छपाईचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो.

मात्र हे साहित्य काही दिवसांच्या वापरानंतर रस्त्यावर, कचऱ्यात किंवा नाल्यांमध्ये फेकले जाते. प्लास्टिक कोटिंग असल्याने हे साहित्य नैसर्गिकरीत्या नष्ट होत नाही व अनेक वर्षे पर्यावरणासाठी घातक ठरते. या प्रचार साहित्याचा सजीवांना कोणताही उपयोग नसून, उलट निसर्गाच्या ऱ्हासाला ते कारणीभूत ठरत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या प्रचार साहित्यावर देवदेवतांचे तसेच विविध राजकीय नेत्यांचे फोटो छापले जातात. प्रचार संपताच हेच साहित्य पायाखाली तुडवले जाते किंवा रद्दीत टाकले जाते. त्यामुळे धार्मिक भावना दुखावल्या जात असून, नेत्यांच्या प्रतिमांचाही अवमान होत असल्याची भावना व्यक्त करण्यात आली. या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांनी स्वयंस्फूर्तीने प्लास्टिक कोटिंग असलेल्या प्रचार साहित्याचा वापर बंद करून पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारावेत, अशी स्पष्ट मागणी करण्यात आली. यासोबतच सरकार व निवडणूक आयोगाने याबाबत कठोर व स्पष्ट निर्देश द्यावेत, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली आहे. पर्यावरण संरक्षणासाठी कुठून तरी या बदलाची सुरुवात व्हावी, अशी भूमिका मांडत या मागणीला सर्वसामान्य नागरिकांकडूनही पाठिंबा मिळत आहे.


रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री | नोकरी विषयक | नावात बदल
आरोग्य विषयक | वाढदिवस | विवाह विषयक




निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

हॉटेल भाड्याने देणे
नगर-सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज-नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.
- संपर्क -
९०११११९३७००

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

दैनिक रयत समाचारचा ख्रिसमस विशेषांक
गुरूवार, ता.२५ डिसेंबर रोजी प्रसिद्ध होत आहे

ख्रिसमस विशेषांक

अंकासाठी लेख, माहिती, जाहीराती पाठवाव्यात

अतिथी संपादक
सॅम्युअल वाघमारे
8788412780

संपादक
भैरवनाथ वाकळे
8805401800

रयत समाचार महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक

जाहीरात पाठविण्यासाठी संपर्क क्रमांक
भैरवनाथ- ८८०५४०१८००, दिपक- ७७७४००१८००,
तुषार- ७९७२३४४४७४, पंकज-९८२२४९६६६४


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# पिसोरेखांड येथील नकाशावरील शेतरस्त्याची मोजणी यशस्वी

## शेतरस्ता चळवळीत श्रीगोंदा तालुका राज्यासाठी दिशादर्शक



**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

श्रीगोंदा तालुका हा शिवपानंद (शेत) रस्त्यांच्या प्रत्यक्ष व प्रभावी अंमलबजावणीमुळे संपूर्ण राज्यासाठी दिशादर्शक ठरत आहे. श्रीगोंदा तहसीलदार सचिन डोंगरे व भूमी उपअधीक्षक सुहास जाधव यांच्या आदेशाने तसेच दादासाहेब जंगले (राज्य समन्वयक शिवपानंद शेत रस्ते चळवळ) यांच्या मार्गदर्शनाखाली ता. १५ डिसेंबर २०२५ रोजी पिसोरेखांड येथील नकाशावरील निश्चित शेत रस्त्याची अधिकृत मोजणी यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आली. ही मोजणी मोजणी अधिकारी वासुदेव पाटील व कुलकर्णी यांच्या मार्फत पार पडली. यावेळी पोलीस कॉन्स्टेबल संभाजी वाबळे, महिला पोलीस कॉन्स्टेबल, ग्राम महसूल अधिकारी सुहास साळवे तसेच शिवपानंद शेत रस्ते चळवळीचे कार्यकर्ते उपस्थित होते.या प्रसंगी दादासाहेब जंगले व श्रीगोंदा तालुका शिवपानंद शेत रस्ते चळवळ कृती समितीचे सदस्य ॲड. गोरख कडूस पाटील यांनी उपस्थित राहून शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.मोजणीच्या वेळी पुरुषोत्तम इंगळे, गणपती इंगळे, विकास इंगळे, नवनाथ खुदांडे, अच्युत इंगळे, त्रिंबक इंगळे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी बांधव उपस्थित होते. सर्व शेतकऱ्यांनी या कामासाठी मोलाचे सहकार्य केले. या यशस्वी कामासाठी चळवळीच्या वतीने पिसोरेखांड येथील सर्व ग्रामस्थांचे आभार मानण्यात आले. दरम्यान, महसूल मंत्री नामदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या ''मुख्यमंत्री बळीराजा पानंद (शेत) रस्ते योजना'' संदर्भात ऐतिहासिक शासन निर्णय घेतलेला आहे. या निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी प्रभावीपणे होण्यासाठी शेतकऱ्यांनी प्रशासन व शिवपानंद शेत रस्ते चळवळीला सहकार्य करणे अत्यंत आवश्यक असल्याचे आवाहन करण्यात आले आहे.

> **शेतकऱ्यांनी प्रशासन व शिवपानंद शेत रस्ते चळवळीला सहकार्य करणे अत्यंत आवश्यक आहे. यामुळे: शेत रस्त्यांबाबत असलेले गैरसमज दूर होतील, प्रत्येक गावातील शेत रस्ते खुले होतील, शेतीसाठी वाहतूक व दळणवळण सुलभ होईल, गावातील वाद-विवाद व तंटे कमी होतील, आणि परिणामी प्रत्येक गाव, तालुका व महाराष्ट्र राज्य समृद्ध व विकसनशील बनेल.**
>
> **दादासाहेब जंगले,** राज्य समन्वयक, शिवपानंद शेत रस्ते चळवळ

# समता पतसंस्थेची चौकशी सहकार मंत्रालयाने थांबविली

## विरोधकांचा डाव फसला- काका कोयटे

**कोपरगाव । किसन पवार**

समता पतसंस्थेची प्रतिमा मलीन करण्याच्या उद्देशाने काही विरोधकांच्या पाठबळावर थकबाकीदारांच्या माध्यमातून दाखल करण्यात आलेली चौकशी अखेर सहकार मंत्रालयाने थांबविली. प्रकरणाची सखोल माहिती व कायदेशीर बाबींचा अभ्यास केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला असून, त्यामुळे सत्याचाच विजय झाला आहे, असे प्रतिपादन समता पतसंस्थेचे चेअरमन काका कोयटे यांनी केले. कोयटे म्हणाले की, यापूर्वीही याच थकबाकीदारांनी सहकार खात्याकडे तक्रारी दाखल केल्या होत्या. त्या चौकशीत संस्थेविरोधात काहीही निष्पन्न झाले नव्हते व संस्थेला क्लीन चिट देण्यात आली होती. तसेच या थकबाकीदारांनी हायकोर्ट व जिल्हा न्यायालयात दाखल केलेल्या याचिकाही फे टाळण्यात आल्या असून, चुकीच्या याचिका दाखल केल्याबद्दल न्यायालयाने त्यांच्यावर दंडही ठोठावला आहे. समता पतसंस्थेच्या वतीने ॲड. विजय गवांदे यांनी सहकार मंत्रालयात संस्थेची बाजू मांडली. त्यांनी सांगितले की, संस्थेची कर्जवसुली ही पूर्णपणे कायदेशीर व नियमानुसार करण्यात आली आहे. थकबाकीदारांच्या मालमत्तेची किंमत ठरवून त्यांच्या समक्षच विक्री करण्यात आली असून, कोणतीही फसवणूक झालेली नाही. दरम्यान, कोपरगाव नगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ मध्ये काका कोयटे हे नगराध्यक्षपदासाठी उमेदवार असल्याने, त्यांची राजकीय बदनामी करण्याच्या उद्देशाने विरोधकांनी थकबाकीदारांना पुढे करून संस्थेविरोधात चौकशी लावण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात आला. मात्र सहकार मंत्रालयात झालेल्या सुनावणीत तथ्य नसल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट झाल्याने सदर चौकशी थांबविण्यात आली. संस्थेचे व्हा. चेअरमन अरविंद पटेल यांनी सांगितले की,



समता पतसंस्था ही गेल्या अनेक वर्षांपासून सहकार खात्याच्या नियमांनुसार पारदर्शक व शिस्तबद्ध पद्धतीने कार्यरत आहे. संस्थेला दरवर्षी होणाऱ्या ऑडिटमध्ये 'अ' दर्जा मिळत असून आर्थिक व्यवहारात कोणतीही अनियमितता आढळलेली नाही. ज्येष्ठ संचालक जितूभाई शहा यांनी माहिती दिली की, सहकार मंत्रालयात दाखल केलेल्या चौकशी अर्जाची प्रत ८ डिसेंबर रोजी संस्थेला प्राप्त झाली होती. त्यानंतर संस्थेच्या वतीने १० डिसेंबर रोजी प्रतियाचिका दाखल करण्यात आली.

सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या उपस्थितीत झालेल्या सुनावणीनंतर चौकशी थांबविण्याचा निर्णय घेण्यात आला. दरम्यान, थकबाकीदारांकडून करण्यात आलेल्या बदनामीविरोधात न्यायालयात अब्रू नुकसानीचा दावा दाखल करण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे जनरल मॅनेजर सचिन भट्टड यांनी दिली. या निर्णयामुळे समता पतसंस्थेच्या कार्यपद्धतीवर सभासद व ग्राहकांचा विश्वास अधिक दृढ झाल्याची भावना व्यक्त होत आहे.

# बिबट्याच्या दहशतीने शेतकरी भयभीत; दिवसा वीजेची मागणी



**शेवगाव । लक्ष्मण मडके**

आव्हाने खुर्दशहापूर परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचा वावर वाढल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. बिबट्याच्या हल्ल्याच्या भीतीमुळे शेतीची मशागत करणे तसेच रात्री पिकांना पाणी देणे शेतकऱ्यांसाठी जोखमीचे ठरत आहे. अनेक शेतकरी जीव मुठीत धरून शेतीकामे करत असून, काही ठिकाणी पिकांना वेळेवर पाणी देता येत नसल्याने नुकसान होण्याची शक्यता आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेत ग्रामस्थांनी शेती पिकांना दिवसा विद्युत पुरवठा देण्यात यावा, यासाठी महावितरणचे उपकार्यकारी अभियंता संतोष डोळे यांना निवेदन दिले. निवेदनात बिबट्याच्या दहशतीमुळे रात्री शेतात जाणे अशक्य झाल्याचे नमूद करत, शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने दिवसा वीजपुरवठा सुरू करण्याची मागणी करण्यात आली. निवेदन स्वीकारताना उपकार्यकारी अभियंता संतोष डोळे यांनी ग्रामस्थांना सकारात्मक प्रतिसाद देत, येत्या आठ दिवसांत दिवसा विद्युत पुरवठा करण्यात येईल, तसेच ढोरजळगाव सब स्टेशनला सोलर प्लांट कनेक्टिव्हिटी पूर्ण झाल्यानंतर आठ दिवसांत वीजपुरवठा सुरळीतपणे सुरू होईल, असे आश्वासन दिले. त्यांच्या या आश्वासनामुळे शेतकऱ्यांमध्ये काहीसा दिलासा मिळाला. यावेळी ग्रामस्थ विष्णू पठाडे, राजेंद्र आहेर, बापू सोंडे, विघ्नहर आहेर, अशोक काकडे, महेश काकडे यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

# आत्मविश्वास जीवनात हमखास यश देतो- घुगे

## संतोष घुगे यांची कॅनल इन्स्पेक्टरपदी निवड



**शेवगाव । शिवाजी घुगे**

घोटण गावचे सुपुत्र संतोष अशोक घुगे यांची जलसंपदा विभाग, संभाजीनगर येथे कॅनल इन्स्पेक्टर पदावर निवड झाली आहे. मेहनत, जिद्द व चिकाटीच्या जोरावर त्यांनी हे यश संपादन केले. अतिशय कमी वयात घराची जबाबदारी स्वतःच्या खांद्यावर घेत संतोष घुगे यांनी शेती करत स्पर्धा परीक्षेचा अभ्यास सुरू ठेवला. त्याचबरोबर लहान भावाला योग्य शिक्षण देत नोकरीस लागण्यासही हातभार लावला. स्वतःच्या संघर्षमय वाटचालीतून त्यांनी मिळवलेले हे यश त्यांच्या आयुष्यातील स्वप्नपूर्तीचा क्षण ठरला आहे. संतोष घुगे यांच्या या यशामध्ये त्यांचे आई-वडील तसेच नाथ इंग्लिश मीडियम स्कूलचे सर्व गावचे आदर्श शिक्षक कै. दादासाहेब गर्जे यांचा मोठा वाटा असल्याचे त्यांनी नमूद केले. आज खऱ्या अर्थाने गर्जे यांचेही स्वप्न पूर्ण झाले असून, मात्र ते आज आपल्यामध्ये नाहीत, ही खंत व्यक्त करत संतोष यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. या यशाबद्दल गावकरी व नातेमंडळींच्या वतीने संतोष घुगे यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी घोटण गावचे सुपुत्र व सैन्य दलात कार्यरत संदीप घुगे यांच्या हस्ते संतोष घुगे व त्यांच्या वडिलांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना संतोष घुगे म्हणाले की, जिद्द, चिकाटी, मेहनत, प्रामाणिकपणा आणि स्वतःवर असलेला आत्मविश्वास यांची योग्य सांगड घातली, तर या जगात अशक्य असे काहीच नाही. जीवनात स्वप्न पाहणे आणि ती पूर्ण करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यामुळे तरुणांनी हताश न होता प्रयत्न सोडू नयेत, असे आवाहन त्यांनी केले. गावकऱ्यांनी संतोष घुगे यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# जनगणनेनंतर शिर्डी, श्रीरामपूर मतदारसंघ खुले

## नेत्यांमध्ये आनंदाचे वातावरण

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

जनगणनेस अखेर मुहूर्त मिळाला असून यामुळे शिर्डी लोकसभा आणि श्रीरामपूर विधानसभा मतदारसंघाचे आरक्षण उठण्याचे संकेत असून हे दोन्हीही मतदार संघ लवकरच खुले होणार आहेत. राजकीय धुरीणांनी भविष्यातील फील्डिंग साठी व्युहरचना आखण्यास सुरुवात केली. शिर्डी लोकसभा मतदार संघ सद्यस्थितीत अनुसूचित जातीसाठी (एससी) तर श्रीरामपूर विधानसभा मतदार संघ देखील अनुसूचित जातीसाठी राखीव आहे. मतदारसंघात खासदार भाऊसाहेब वाकचौरे तर आमदार हेमंत ओगले हे कार्यरत आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्री मंडळाच्या बैठकीत गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या जनगणनेबाबत निर्णय घेण्यात आला आहे. २०२७ मध्ये देशभरात दोन टप्प्यात ही जनगणना होणार आहे. केंद्र सरकारच्या निर्णयानुसार २०२७ मध्ये जातनिहाय सविस्तर जनगणना होणार आहे. यानंतर नव्याने मतदार संघाची बांधणी होईल, या काळात नव्या मतदारसंघाची देखील रचना होणार आहे. त्यामुळे ही जनगणना जास्त महत्त्वाची आहे. या जनगणनेत देशात कोणत्या भागात कोणत्या समाजाचे वास्तव्य आहे, तसेच विविध समाजाची नेमकी काय लोकसंख्या आहे याची देखील सखोल माहिती मिळणार आहे. जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात घरांची यादी आणि घरांची गणना समाविष्ट आहे हा टप्पा एप्रिल २०२६ ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत पूर्ण केला जाणार आहे. दुसरा टप्पा फेब्रुवारी २०२७ मध्ये होणार आहे. हा टप्पा लोकसंख्या गणना वर केंद्रित राहील. सदरची जनगणना डिजिटल असणार आहे. दरम्यान, जनगणने नंतर मतदार संघाची पुनर्रचना होणार असल्यामुळे या पार्श्वभूमीवर शिर्डी लोकसभा आणि श्रीरामपूर विधानसभा मतदार संघ खुला होण्याचे संकेत आहेत. दिग्गज राजकारण्यांनी आतापासूनच यासाठीचे आपली रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे.

सध्याचे आरक्षण हे २५ वर्षासाठी होते. खासदार भाऊसाहेब वाकचौरे आणि आमदार हेमंत ओगले हे अनुक्रमे शिर्डी लोकसभा आणि श्रीरामपूर विधानसभा मतदारसंघातून २० वर्षापर्यंतचे नेतृत्व करीत आहेत. जनगणना झाली नसती आणि आयोगाने मतदार संघ पुनर्रचनेची घोषणा केलीच नसती तर शिर्डी लोकसभा आणि श्रीरामपूर विधानसभा मतदार संघाचे अजून पाच वर्षाचे टर्म शिल्लक राहिले असते.

## किस्से निवडणुकीचे...

**सलीमखान पठाण**

### निकालाच्या उत्सुकतेबरोबरच उमेदवारांची वाढली धडधड

श्रीरामपूर नगरपालिका निवडणुकीच्या निकालाची तारीख आता उंबरठ्यावर येऊन ठेपली आहे. येत्या रविवारी नगराध्यक्ष पदासह नगरसेवक पदाच्या ३४ जागांचा निकाल जाहीर होणार असल्याने विविध पक्षांसह अपक्ष उमेदवारांची धडधड वाढली आहे. निवडणुकीत यश मिळविण्यासाठी प्रचारासह सर्वच मार्गांचा अवलंब केल्याने प्रत्येक उमेदवार आशावादी आहे. मतदार राजा हुशार असल्याने त्याने सर्वच उमेदवारांना आशेवर ठेवले आहे. स्थानिक निवडणूक असल्याने उमेदवारांनी सर्व मतदारांना गृहीत धरून प्रचार केला. कोणती मते आपल्याला हमखास मिळतील आणि कोणती विरोधात जातील, याची गोळाबेरीजही उमेदवारांनी केली. काठावर असलेल्या मतदारांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले. तरीही नेमका निकाल काय लागणार, याबाबत उमेदवारांच्या मनात संभ्रम कायम आहे. निवडणूक खर्चाचा भार पेलताना अनेक उमेदवारांची मोठी कसरत झाली. काहींनी स्वतःची साठवलेली पुंजी खर्च केली, तर काहींनी कर्ज काढल्याचेही सांगितले जाते. काही उमेदवारांना पक्षातील नेतेमंडळींकडून आर्थिक मदत मिळाल्याची चर्चा आहे. तर काही उमेदवार परकीय मदतीवर निवडणूक लढवत असल्याचेही बोलले जाते. त्यांचा उद्देश निवडून येणे नसून एखाद्याला पराभूत करणे हाच असल्याची चर्चा शहरात रंगली आहे. निवडणूक खर्चासाठी काही व्यापारी व व्यावसायिकांना धमकावून वर्गणी गोळा केल्याचे आरोपही चर्चेत आहेत. तसेच दोन नंबरचे धंदे करणाऱ्यांकडून 'निवडणूक दक्षिणा' वसूल केल्याची कुजबुज ऐकू येत आहे. या सर्व गोंधळामुळे अनेक चांगले इच्छुक उमेदवार निवडणूक लढविण्यापासून दूर राहिले. काही प्रभागांत स्थानिक परिस्थितीचा विचार न करता दिलेल्या उमेदवारांना फटका बसणार असल्याची चर्चा आहे, तर काहींनी थेट संपर्क साधून मतदारांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला. 'सख्खे शेजारी, पक्के वैरी' या म्हणीची प्रचिती देणारे किस्सेही समोर येत आहेत. शेजाऱ्यांनीच विरोधी उमेदवारांना मदत केल्याच्या चर्चांनी रंग घेतला आहे. एकूणच निकाल जवळ येत असल्याने उत्सुकता शिगेला पोहोचली असून, रविवारी मतमोजणीत मतदारांचे पारडे कुणाच्या बाजूने झुकते आणि देव कुणाला पावतो, याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.. त्यामुळे आता कोणी निवडणुकीचा विषय जरी काढला तरी कोणाचीही ऐकायची मानसिक तयारी राहिलेली नाही. आता नशिबाचा हवाला देऊन सगळेजण एकमेकाला गप्प करीत आहेत. काहीजण विरोधी उमेदवारांची खिल्ली उडवत आहेत तर काही जण मी किती प्रयत्न केले हे सांगण्याचा मुद्दामहून प्रयत्न करीत आहेत. कार्यकर्त्यांचे गणित ऐकून नेते सुद्धा अवाक झाले आहेत. त्यामुळे निकालाबाबत काहीही ऐकून घेण्याची मानसिकता सध्या तरी कुणाची राहिलेली नाही, असे चित्र शहरात पहावयास मिळत आहे.

# जवळा परिसरात बिबट्या सदृश्य प्राण्याचा वावर;

## ग्रामपंचायतीकडून सतर्कतेचे आवाहन

**जामखेड । रिजवान शेख**

जवळा परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्या सदृश्य प्राण्याचा वावर आढळून आल्याने ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. काही नागरिकांना रात्रीच्या सुमारास शेतशिवार व वस्तीजवळ संशयास्पद हालचाली दिसून आल्याने जवळा ग्रामपंचायतीने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. ग्रामपंचायतीने दिलेल्या सूचनेनुसार बिबटे रात्री अधिक सक्रिय असल्याने नागरिकांनी रात्री एकटे बाहेर जाणे टाळावे, घरांचे दरवाजे बंद ठेवावेत तसेच उघड्यावर झोपू नये. लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेकडे विशेष लक्ष देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पाळीव प्राणी सुरक्षित ठिकाणी बांधून ठेवावेत, घराच्या आसपासची झुडपे व दाट झाडी साफ ठेवावी, तसेच कचरा उघड्यावर टाकू नये, असेही सांगण्यात आले आहे. रात्री बाहेर पडताना टॉर्च व काठी सोबत ठेवावी. बिबट्या दिसल्यास घाबरू नये व त्याला चिथावू नये. संशयास्पद हालचाल आढळल्यास तात्काळ वन विभागाच्या १९२६ या हेल्पलाईनवर संपर्क साधण्याचे आवाहन सरपंच सुशील आव्हाड व ग्रामपंचायतीने केले आहे.

# नगरपालिकेकडून मोकाट कुत्र्यांच्या निर्बिजीकरणाची मोहीम सुरू

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**



शहरात मोकाट कुत्र्यांचा उपद्रव मोठ्या प्रमाणात वाढला असून, याबाबत नागरिकांकडून येणाऱ्या वाढत्या तक्रारी लक्षात घेऊन नगरपालिकेमार्फत मोकाट कुत्र्यांच्या निर्बिजीकरणाची मोहीम हाती घेण्यात आली, अशी माहिती पालिका सूत्रांनी दिली. या मोहिमेसाठी कबड्डी परिसरातील कचरा डेपो येथे निर्बिजीकरण केंद्र उभारण्यात आले असून, तेथे पिंजऱ्यांमध्ये एकाच वेळी २५ कुत्र्यांवर शस्त्रक्रिया केली जात आहे. चालू वर्षात आतापर्यंत १०० पेक्षा अधिक कुत्र्यांचे निर्बिजीकरण करण्यात आले आहे. निर्बिजीकरणासाठी मोकाट कुत्रे पकडून कचरा डेपोतील पिंजऱ्यांमध्ये जमा करण्यात येतात. २५ कुत्रे झाल्यानंतर पशुवैद्यकीय डॉक्टरांच्या माध्यमातून शस्त्रक्रिया केली जाते. शासनाच्या पूर्वीच्या आदेशानुसार ज्या भागातून कुत्रे पकडण्यात आले होते, त्याच भागात त्यांना सोडण्याचे निर्देश होते. मात्र, न्यायालयाच्या निर्देशानुसार आता कुत्र्यांना पुन्हा सोडण्याऐवजी त्यांच्यासाठी निवारा केंद्र उभारण्याच्या सूचना राज्य सरकारने दिल्या असल्याचे पालिका सूत्रांनी सांगितले. त्यानुसार कबड्डी येथील कचरा डेपो परिसरात कुत्र्यांसाठी निवारा केंद्र उभारण्यात येणार आहे. एकीकडे शहरातील नागरिकांना मूलभूत सुविधा व आरोग्यविषयक प्रश्न प्रलंबित असताना, आता पालिकेवर कुत्र्यांची देखभाल करण्याची जबाबदारीही आली असल्याची चर्चा नागरिकांत होत आहे. सध्या शहरात मोकाट कुत्र्यांचा उपद्रव वाढलेला असून, काही भागात बिबट्यांचा वावरही असल्याने या कुत्र्यांमुळे धोका वाढत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. पालिकेमार्फत सुरू असलेल्या निर्बिजीकरण मोहिमेमुळे शहरातील मोकाट कुत्र्यांचा उपद्रव काही प्रमाणात तरी कमी होईल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. काही नागरिकांनी कुत्र्यांना औषधे देऊन मारण्याची मागणी केली असली तरी कायद्यानुसार तसे करणे शक्य नसल्याचे पालिकेने स्पष्ट केले आहे. कुत्रे मारण्यासाठी वापरली जाणारी औषधेही बंदीमुळे उपलब्ध नसल्याने त्यांची देखभाल करावी लागत आहे. सध्या कचरा डेपोतील पिंजऱ्यांमध्ये या कुत्र्यांची व्यवस्था करण्यात आली असून, त्यांना दररोज भात व इतर खाद्य पुरविले जात आहे. मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप, आरोग्य अधिकारी घायवट, स्वच्छता निरीक्षक संजय आरणे तसेच आरोग्य विभागातील कर्मचारी ही मोहीम यशस्वी करण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

# रस्ते अपघातातील बळींची संख्या चिंताजनक

उत्तर प्रदेशातील मथुरा एक्सप्रेस वे वर मंगळवारी मृत्यूचे तांडव पाहायला मिळाले. दाट धुक्यामुळे पहाटे साडे चारच्या सुमारास आठ बस आणि तीन मोटारी एकमेकांवर आदळल्या. त्यानंतर वाहनांनी पेट घेतला यामध्ये २५ जणांचा होरपळून मृत्यू झाला तर ५९ जण गंभीर जखमी झाले. या अपघाताने देशभर हळहळ व्यक्त होत आहे. अर्थात असा भीषण अपघात घडल्याची ही पहिली वेळ नाही याआधी असे अनेक अपघात देशात घडले असून त्यात लाखो लोकांचा जीव गेला. दहा वर्षात देशभरात झालेल्या अपघातात १५ लाख ३० हजारांहून अधिक नागरिकांचा मृत्यू झाला. केंद्रीय रस्ते मंत्रालयाने ही आकडेवारी जाहीर केली. केंद्रीय रस्ते मंत्रालयाच्या संकेत स्थळावर ही आकडेवारी उपलब्ध असून त्यानुसार सण २०१३ ते २०२३ या दहा वर्षात रस्ते अपघातात बळी पडलेल्यांच्या संख्येत महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर आहे. पहिल्या स्थानावर उत्तर प्रदेश तर दुसऱ्या स्थानावर तामिळनाडू ही राज्ये आहेत.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५
समाजसंवाद

महाराष्ट्रासारख्या प्रगतशील राज्यासाठी ही आकडेवारी भूषणावह नाही. रस्ते अपघातात जर इतके लोक दरवर्षी मरण पावत असतील तर ती चिंतेची बाब आहे. विशेष म्हणजे यातील बहुतांशी मृत्यू हे २० ते ५० या वयोगटातील आहे. याचाच अर्थ रस्ते अपघातात सर्वाधिक मृत्यू हे तरुणांचे होत आहेत. ज्या तरुणांकडे देश भावी आधारस्तंभ म्हणून पाहत असतो तेच तरुण जर असे अकाली मृत्यू पावत असेल तर ती देशाची मोठी हानी आहे. केवळ सर्वसामान्य तरुणच नाही तर देशातील अनेक महनीय व्यक्तींचा मृत्यू देखील रस्ते अपघातात झाला आहे. दोन वर्षापूर्वी शिवसंग्राम पक्षाचे संस्थापक अध्यक्ष आणि मराठा समाजाचे नेते विनायक मेटे यांचे अपघाती निधन झाले. त्यांच्या निधनाने मराठा समाजाचीच नव्हे तर राज्याची मोठी हानी झाली. त्यांच्या अपघाती निधनातून राज्य सावरत नाही तोच टाटा उद्योग समूहाचे माजी अध्यक्ष व प्रसिद्ध उद्योगपती सायरस मिस्त्री यांचे अपघाती निधन झाले. सायरस मिस्त्री यांचा गुजरातच्या अहमदाबादवरून मुंबईला जाणाऱ्या मार्गावर चारोटी जवळ सुर्या नदीच्या पुलावर अपघात झाला. सायरस मिस्त्री यांचे देशाच्या औद्योगिक विकासात महत्वाचे योगदान आहे. त्यांच्या निधनाने उद्योग विश्वात मोठी शोककळा पसरली होती. सायरस मिस्त्री, विनायक मेटे यांच्यासारख्या समाजातील महनीय व्यक्तींच्या अशा अकाली निधनाने समाजाचे मोठे नुकसान होत आहे. विनायक मेटे, सायरस मिस्त्री हे समाजातील महनीय व्यक्ती आहेत म्हणून त्यांच्या निधनाची बातमी झाली. रस्ते अपघातात दरवर्षी लाखो लोकांचा मृत्यू होतो देशात सर्वात जास्त मृत्यू रस्ते अपघातात होतात. अपघातात जखमी आणि कायमचे जायबंदी होणाऱ्यांची संख्या तर अगणित आहे. विशेष म्हणजे यात तरुणांचा समावेश अधिक आहे. ज्या तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत त्याच तरुणांचे अपघातात निधन होत असेल तर ती देशाची मोठी हानी आहे. अनेक प्रयत्न करूनही देशातील रस्ते अपघातांची संख्या का कमी होत नाही हा संशोधनाचा विषय आहे. वाढत्या रस्ते अपघातांना जितकी व्यवस्था जबाबदार आहेत तितकीच मानवी चुकाही जबाबदार आहेत. टोलच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची वसुली केली जात असतानाच महामार्गावर जीवघेण्या ब्लॅकस्पॉट मध्ये सुधारणा होत नाही. त्याचप्रमाणे रस्त्यांवरील खड्डे, धुळीचे साम्राज्य, महामार्गावरील अतिक्रमणे, सर्व्हिस रोडचा अभाव, रस्त्यावरच उभी केली जाणारी अवजड वाहने, बंद पडलेल्या वाहनांसाठी कमी पडत असलेली मदत केंद्रे, मोकाट जनावरे, अपुरे दुभाजक याबाबी अपघातांसाठी कारणीभूत ठरत आहेत. महामार्गावर वाहन चालकांकडून वेग मर्यादा पाळण्यात येत नाही. बहुतेक प्रवासी १०० किमी पेक्षा अधिक वेगाने वाहने चालवतात. ट्रक व इतर मोठ्या वाहनांकडून लेनची शिस्त पाळली जात नाही. काही वाहन चालक तर दारु पिऊन वाहने चालवतात तर काही वाहन चालक वाहन चालवत असताना मोबाईलवर बोलतात. वाहनांची व्यवस्थित निगा न राखणे, सीट बेल्ट न लावणे या गोष्टीही अपघातास कारणीभूत ठरतात. नियम माहीत असूनही चालक त्यांचे पालन करत नाहीत. सगळ्यांनाच कमी वेळात आपले ठिकाण गाठायचे असते. नियमांचे पालन न केल्यानेच अपघातांची संख्या कमी होत नाही. अपघातांची संख्या कमी करायची असेल तर वाहन चालकांना नियमांचे पालन करावेच लागेल. नियम पाळा अपघात टाळा!



## स्वामी समर्थ गुरुपीठ तालुका प्रतिनिधीपदी एकनाथ खिलारी

### साई सेवा सामाजिक संघर्ष प्रतिष्ठानकडून सत्कार

**अहमदनगर । विजय मते**

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ, श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक अंतर्गत कार्यरत प्रधान न्यासाच्या वतीने अहिल्यानगर तालुक्याचे तालुका प्रतिनिधी म्हणून एकनाथ खिलारी यांची पुढील गुरुपौर्णिमा २०२६ पर्यंत नियुक्ती करण्यात आली. या नियुक्तीबद्दल साई सेवा सामाजिक संघर्ष प्रतिष्ठानच्या वतीने सुनील त्र्यंबके यांच्या हस्ते खिलारी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सोनाली पालवे, बबन पालवे, भाऊसाहेब देशमाने, शुभांगी पाटील, महादेव शिरसाठ, निवृत्ती भांगे, सुभाष निंबाळकर, राजू शिंपणकर, देविदास डहाळे यांच्यासह मोठ्या संख्येने सेवेकरी उपस्थित होते.

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ, ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक (रजि. नं. एफ-७६५५/नाशिकदिंडोरी प्रणित) या प्रधान न्यासाच्या आचारसंहितेनुसार ही नियुक्ती करण्यात आली. श्री गुरुपीठ, त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या दरमहा मासिक महासभेस उपस्थित राहणे, प.पू. गुरुमाऊलींच्या मार्गदर्शनानुसार तालुकानिहाय सर्व केंद्रांशी समन्वय साधून कार्य करणे, तसेच सर्व केंद्रांवरील अध्यात्मिक सेवा कार्यरत ठेवण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली. तसेच तालुकानिहाय केंद्रांच्या अध्यात्मिक सेवेचा व आर्थिक हिशोबाचा जमाखर्च अहवाल नियमितपणे श्री गुरुपीठ येथे सादर करणे व सर्व कामकाज दिंडोरी दरबार, श्री गुरुपीठ यांच्या अधीन राहून पार पाडण्याचे निर्देश नियुक्तीपत्राद्वारे देण्यात आले आहेत. स्वामी समर्थ महाराजांच्या इच्छेत इच्छा मिसळून महाराजांना भूषणावह ठरेल असे आचरण ठेवण्याचे आवाहनही करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी अभिषेक खिलारी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## राजेंद्र बोरुडेंच्या उमेदवारीने प्रभाग तीनमध्ये मोठी चुरस?

### प्रतिस्पर्ध्यांच्या पायाखालची वाळू घसरू लागल्याची चर्चा

**पाथर्डी । रयत समाचार**

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराने निवडणुकीतून माघार घेतली असली तरी काही प्रभागांत या पक्षाच्या उमेदवारांनी मोठी चुरस निर्माण केली आहे. प्रभाग क्रमांक तीनमधील उमेदवार राजेंद्र बोरुडे यांनी कमालीचा जोर लावल्याने या प्रभागात काट्याची टक्कर होताना दिसून येत आहे. त्यामुळे, राजेंद्र बोरुडे यांच्या प्रतिस्पर्धी उमेदवारांच्या पायाखालची वाळू घसरू लागल्याची मतदारांत चर्चा आहे. राजेंद्र बोरुडे, हे माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील यांचे कट्टर समर्थक म्हणून ओळखले जातात. ते प्रभाग क्रमांक तीनमधून निवडणूक लढवत आहेत. सुरुवातीला महाविकास आघाडी व भाजपाच्या उमेदवारांच्या भोवती फिरत असलेल्या या निवडणुकीत, राजेंद्र बोरुडे यांच्या उमेदवारीने धीम्या गतीने चुरस निर्माण केली असल्याचं बोललं जात आहे. या प्रभागात मराठा व माळी समाजाचा मोठा मतदार आहे. राजेंद्र बोरुडे यांना हळूहळू सर्वच समाजांतील मतदारांचे समर्थन मिळत गेल्याने, याही प्रभागात धक्कादायक निकाल लागू शकतो-अशी मतदारांत कुजबूज सुरू झाली आहे. निवडून येण्याची क्षमता असलेल्या अनेक उमेदवारांना ऐनवेळी डावलले गेल्याने माळी समाज नाराज असल्याचं बोललं जात आहे. हा समाज काय व कसा निर्णय घेतो, यावर या प्रभागातील यशापयशाचं समीकरण ठरणार आहे. गेल्या विधानसभेच्या निवडणुकीत, राजेंद्र बोरुडे यांनी माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील यांच्यासाठी मोठे कष्ट घेतले होते. त्यामुळे, घुले पाटील यांची दृश्य-अदृश्य ताकद त्यांना मिळत आहे. प्रभाग क्रमांक तीनमध्ये तनपुरवाडीचा समावेश आहे. महाविकास आघाडी व भाजपाचे या प्रभागात



असलेले उमेदवार तुल्यबळ असल्याने त्यांच्यातच संघर्ष निर्माण होईल, असं सुरुवातीचं चित्र होतं. परंतु, मनमिळाऊ स्वभाव व सतत लोकांत सक्रिय असलेल्या राजेंद्र बोरुडे यांचं नांवही अचानक शर्यतीत आलं. त्यांनी कासवाच्या गतीने प्रचार केला असला तरी त्यात कमालीचं सातत्य असल्याने त्यांच्या रुपाने या प्रभागात तीसरा धृव निर्माण झाला आहे. काही झालं तरी निवडून यायचंच असा चंग त्यांनी बांधला असून अहोरात्र प्रचारात झोकून दिलं आहे. त्यांच्या उमेदवारीचा कुणाला फटका बसतो किंवा वेळ आली तर तेही विजयी होऊ शकतात, अशी मतदारांत चर्चा आहे. संजय भागवत यांनी माघार घेतली नसती तर प्रभाग क्रमांक तीनमध्ये अजित पवार गटाला यापेक्षाही निर्णायक यश मिळालं असतं. परंतु, भागवत यांनी माघार घेऊनही राजेंद्र बोरुडे यांनी उभं केलेलं कडवं आव्हान हा सध्या तरी चर्चेचा विषय बनला आहे. त्यांनी निर्माण केलेली चुरस यशात परिवर्तित होते की नाही, हे सिद्ध होण्यासाठी २१ डिसेंबरची वाट पहावी लागेल.



## संताजी महाराज पुण्यतिथी उत्साहात साजरी

**नेवासा । विजय खंडागळे**

तिळवण तेली समाजाच्या वतीने राष्ट्रसंत शिरोमणी श्री संताजी जगनाडे महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त जगद्गुरु संत तुकाराम महाराज गाथा पारायणाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. हा धार्मिक सोहळा सोनई येथील भजनी मंडळाच्या मंदिरात बुधवारपासून सुरू झाला होता. ता. १० ते १७ डिसेंबर २०२५ या कालावधीत हभप रामदास क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली दररोज भक्तिमय वातावरणात विधिवत पूजन, आरती, पुष्पांजली व फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. संत तुकाराम महाराज गाथेचे लेखक राष्ट्रसंत शिरोमणी श्री संताजी महाराज जगनाडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त हा सप्ताह धार्मिक श्रद्धेने पार पडला. या सोहळ्याच्या निमित्ताने माऊली महिला मंडळ, तेली महिला मंडळ तसेच समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी समाजातील दिवंगत पत्रकारांना पत्रकार विजय खंडागळे यांच्याकडून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी अशोक क्षीरसागर यांनी मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी आर्थिक मदत व सहकार्य करण्याचे आवाहन केले. आशाताई सुद्रिक यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाची सांगता महाप्रसादाने करण्यात आली. कार्यक्रमाचे आभार अशोक सुद्रिक यांनी मानले.

### धावपटूंना सहभागी होण्याचे आवाहन

## २८ डिसेंबरला क्रॉस कंट्री अजिंक्यपद स्पर्धा

**अहमदनगर । रयत समाचार**

अहमदनगर जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशन, अहिल्यानगर यांच्या वतीने जिल्हास्तरीय क्रॉस कंट्री अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. ही स्पर्धा रविवार, ता. २८ डिसेंबर रोजी सकाळी ८ वाजता वाडिया पार्क, जिल्हा क्रीडा संकुल येथे होणार आहे. जिल्ह्यातील पात्र धावपटूंनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन दिनेश भालेराव, राहुल काळे व श्रीरामसेतु आवारी यांनी केले. या स्पर्धेत प्रत्येक गटातील प्रथम तीन क्रमांकाच्या विजेत्यांना गुणवत्ता प्रमाणपत्र व पदक देऊन गौरविण्यात येणार आहे. या स्पर्धेच्या आधारे अहमदनगर जिल्ह्याचा संघ निवडण्यात येणार असून, हा संघ ता. १० जानेवारी २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय क्रॉस कंट्री स्पर्धेत सहभाग घेणार आहे. स्पर्धेत पुरुष व महिला १० कि.मी., २० वर्षांखालील मुले ८ कि.मी., १८ वर्षांखालील मुले ६ कि.मी., १६ वर्षांखालील मुले २ कि.मी., २० वर्षांखालील मुली ६ कि.मी., १८ वर्षांखालील मुली ४ कि.मी. आणि १६ वर्षांखालील मुली २ कि.मी. अशा शर्यती होणार आहेत. १४ वर्षांखालील खेळाडूंना स्पर्धेत सहभागी होता येणार नाही. स्पर्धा केवळ जिल्ह्यातील खेळाडूंकरिता खुली असून नावनोंदणी सकाळी ७ वाजता स्पर्धास्थळीच करण्यात येईल. सहभागी खेळाडूंनी आधार कार्ड, जन्म दाखला व नंबर सोबत आणणे बंधनकारक आहे. अधिक माहितीसाठी दिनेश भालेराव ९९२३८३७८८८, राहुल काळे ९९७५३२०८३७ व श्रीरामसेतु आवारी ९३२२०१५०४६ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.




## दिव्यांग मुलांची राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धा उत्साहात

**अहमदनगर । रयत समाचार**

राष्ट्रीय दृष्टिहीन संघ, महाराष्ट्र राज्य व जिल्हा शाखा अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय अंध मुलांची राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धा २०२५ जिल्ह्यात उत्साहात पार पडली. ता. १६ ते १८ डिसेंबर २०२५ या कालावधीत झालेल्या या स्पर्धेत राज्यातील विविध जिल्ह्यांतील संघांनी सहभाग नोंदविला. अंध क्रीडापटूंनी दाखवलेली जिद्द, कौशल्य व संघभावना उपस्थितांच्या विशेष कौतुकास पात्र ठरली. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी आयुक्त यशवंत डांगे, नरेंद्र फिरोदिया, सविता काळे, दत्तात्रय जाधव, अनिल मालवे, रामचंद्र सुखटनकर, गोविंद लासुरे, अजित माने, ज्योती कदम, डॉ. बापू कांडेकर व डॉ. प्रकाश कांकरिया यांचे विशेष सहकार्य लाभले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे मैदान व्यवस्था, निवास, भोजन तसेच इतर आवश्यक सुविधा सुरळीतपणे उपलब्ध करून देण्यात आल्या. आयोजकांच्या नियोजनबद्ध कार्यामुळे संपूर्ण स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडली. समारोपप्रसंगी राष्ट्रीय दृष्टिहीन संघ, महाराष्ट्र राज्य व जिल्हा शाखा अहिल्यानगरचे अध्यक्ष सुभाष शिंदे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, अंध क्रीडापटूंमध्ये अपार आत्मविश्वास व जिद्द आहे. अशा स्पर्धांमुळे त्यांच्यातील क्रीडागुणांना चालना मिळते व समाजात सकारात्मक संदेश जातो. भविष्यात अंध खेळाडूंसाठी अधिकाधिक क्रीडासंधी निर्माण करण्यासाठी संघटना कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी महासचिव नितीन पुंडलिक सोनार यांनी आपल्या भाषणात विविध संघटनांनी दृष्टिहीन खेळाडूंसाठी अशा प्रकारच्या अधिकाधिक स्पर्धा आयोजित करण्याचे आवाहन केले. अशा उपक्रमांमुळे त्यांना नवे व्यासपीठ मिळते, कलागुणांना वाव मिळतो तसेच आत्मविश्वास वाढीस लागतो, असे त्यांनी नमूद केले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाबद्दल सहभागी संघ, खेळाडू, प्रशिक्षक तसेच सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आयोजकांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

## राहुल लांडे यांची भारतीय सैन्यदलात निवड

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

सालवडगाव येथील युवक राहुल भारत लांडे यांची भारतीय सैन्यदलात निवड झाली असून, त्यांनी आपल्या गावासह तालुक्याचे नाव उज्ज्वल केले. सर्वसामान्य कुटुंबातून आलेल्या राहुल यांच्या या यशामुळे परिसरात समाधान व अभिमानाची भावना व्यक्त होत आहे. राहुल लांडे यांनी शेवगाव येथील



न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजमध्ये अकरावी व बारावीचे शिक्षण घेतले. शिक्षण घेत असतानाच त्यांनी अकरावीमध्ये एनसीसीमध्ये प्रवेश करून शिस्तबद्ध जीवनाची सुरुवात केली. सलग तीन वर्षांच्या एनसीसी प्रशिक्षणामुळे त्यांच्यात देशभक्ती, नेतृत्वगुण तसेच शारीरिक तंदुरुस्ती विकसित झाली. भारतीय सैन्यात भरती होण्याच्या ध्येयाने प्रेरित होऊन राहुल यांनी पाथर्डी येथील कमांडो करिअर अकॅडमीमध्ये प्रवेश घेऊन कठोर प्रशिक्षण घेतले. शारीरिक कसोटी, लेखी परीक्षा तसेच निवड प्रक्रियेतील सर्व टप्पे यशस्वीरीत्या पार करत अखेर त्यांची इंडियन आर्मीमध्ये निवड निश्चित झाली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजचे प्राध्यापक, एनसीसी प्रशिक्षक, कमांडो करिअर अकॅडमीचे मार्गदर्शक, ग्रामस्थ तसेच कुटुंबीयांकडून राहुल लांडे यांचे अभिनंदन होत आहे. त्यांचे हे यश शेवगाव तालुक्यातील तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत असून, कठोर परिश्रम व योग्य मार्गदर्शन मिळाल्यास यश निश्चित मिळते, याचा प्रत्यय त्यांनी दिला.



## प्रहार दिव्यांग संघटनेकडून पत्रकारांचा सन्मान

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

विकासाच्या प्रत्येक घडामोडीवर बारकाईने लक्ष ठेवून निर्भीड व सत्य पत्रकारिता करणारे ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार कुरुमकर, श्रीरंग साळवे, भीमराव उल्हारे तसेच पत्रकार आप्पा चव्हाण यांची पत्रकारितेतील भूमिका अत्यंत प्रेरणादायी असल्याचे गौरवोद्गार प्रहार दिव्यांग संघटनेचे राजेंद्र पोकळे यांनी काढले. प्रहार दिव्यांग संघटनेच्या वतीने ज्येष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधत राष्ट्र सह्याद्रीचे ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार कुरुमकर, दक्षटाइमचे श्रीरंग साळवे, संघर्षनामा मल्टीमीडियाचे संपादक भीमराव उल्हारे व नगर सह्याद्रीचे आप्पा चव्हाण यांचा श्रीगोंदा येथील शनिश्वर मंदिरात प्रहार दिव्यांग संघटना व खासदार श्रीकांत शिंदे फाउंडेशन, अहमदनगर शाखा श्रीगोंदा यांच्यावतीने यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी बोलताना राजेंद्र पोकळे म्हणाले की, पत्रकार नंदकुमार कुरुमकर यांनी गेल्या २६ वर्षांपासून उत्कृष्ट पत्रकारिता केली असून, जिथे अन्याय आहे तिथे त्यांनी नेहमीच परखड लिखाण करून अन्यायग्रस्तांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे. दिव्यांग बांधवांच्या विविध समस्या व प्रलंबित प्रश्न त्यांनी सातत्याने प्रसिद्धीच्या माध्यमातून मांडले असून, अनेक वेळा शासनालाही त्याची दखल घ्यावी लागली आहे. अशा अभ्यासू व दूरदृष्टी असलेल्या पत्रकारांचा सन्मान करणे हे आपले कर्तव्य असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी प्रहार दिव्यांग संघटनेचे बाळासाहेब पिपाडा म्हणाले की, पत्रकार नंदकुमार कुरुमकर, मेजर भीमराव उल्हारे, आप्पा चव्हाण व श्रीरंग साळवे यांचे पत्रकारितेतील कार्य समाजहिताचे असून, प्रत्येक घटकातील समस्यांना वाचा फोडणारे आहे. दिव्यांग बांधवांना जो न्याय मिळत आहे, तो या अभ्यासू पत्रकारांच्या प्रखर लेखणीमुळेच शक्य होत असल्याचे त्यांनी सांगितले. या सन्मान सोहळ्यास डॉ. सोमनाथ देवकाते, शशिकांत आंधळकर, सुरेश गलांडे, प्रताप आल्हाट, अमोल भागवत तसेच शनिश्वर मंदिराचे पुजारी शिंदे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल भागवत यांनी केले, तर आभार प्रताप आल्हाट यांनी मानले.